# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०५/०६/२०१८**

## १) घरफोडी :-

**वजिराबाद :-** दिनांक २१.०५.२०१८ रोजी चे २२.०० ते ३०.०५.२०१८ चे ०९.३० वा. चे दरम्यान, राहात्या घरुन कालीका माता मंदीर कालेज टेकडी जुना मोंढा नांदेड येथे यातील फिर्यादी बाई तिच्या आईकडे हैद्राबाद गेली असताना त्यांच्या घरालगत असलेल्या टिनपत्राच्या शेडमध्ये कपाटातील सोन्याचे दागीने व दोन गॅस सिलेंडर व नगदी रुपये असा एकुण १०,५००/- रुपयाचा माल आज्ञात चोरटयानी चोरुन नेला. वगैर **फिर्यादी रचना राधेश्याम शर्मा, वय ४५ वर्षे व्यवसाय घरकाम रा. कालीका माता मंदीर कालेज टेकडी जुना मोंढा नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. वजिराबाद** गुरनं.१२१/२०१८ कलम ४६१, ३८०, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/१९६८ ढगे, मो.क्रं. ०२४६२-२३६५००** हे करीत आहेत.

## २) बेकायदेशिररित्या शिंदी बाळगुन मिळुन आला :-

**धर्माबाद:-** दिनांक ०४.०६.२०१८ चे १२.३० वा. चे सुमारास, बाळापुर ते आय. टी. आय. जाणारे रोडवर, धर्माबाद जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिररित्या शिंदीचे आर्धा लिटर चे ७०० पॉकेट किंमत अंदाजे ७,०००/- रुपये व एक ॲटो क्रमांक ए.पी.२५/एक्स-३९२८ जुना वापरता अंदाजे किंमत ८०,०००/- रुपये असा एकुण ८७,०००/- रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उददेश्याने वाहतूक करीत असताना ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वैगेरे **फिर्यादी पोहेकॉ/१९२१ शेषेराव भिमराव कदम, ने.पो.स्टे.धर्माबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.धर्माबाद** गुरन ११८/२०१८ कलम ६५ (ई) मुप्रोका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१०७८ मसलेकर, मो.क्र. ०२४६५-२४४१३३** हे करीत आहेत.

## ३) कल्याण ओपन नावाचा जुगार :-

**अ) कंधार :-** दिनांक ०४.०६.२०१८ रोजी चे १५.४५ वा. चे सुमारास जि. प. कंधार शाळेचे मैदानात जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या आकडयावर पैसे लावुन कल्याण ओपन नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्य असे एकुण ४,५७०/- रुपयाचा मालासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोना/२०९० संजय दिगांबरराव पांढरे, ने. स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. कंधार** गुरन. १३६/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/खलील मो.क्र. ९७६३२८३७५६** हे करीत आहेत.

**ब) विमानतळ :-** दिनांक ०४.०६.२०१८ रोजी चे १४.०५ वा. चे सुमारास शिवनेरी नगर चॉंहेल प्लॉट, नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या आकडयावर पैसे लावुन टाईम बाजार नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्य असे एकुण ४,५००/- रुपयाचा मालासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोनि/ अनिरुध्द सोपानराव काकडे, ने. पो. स्टे. विमानतळ** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. विमानतळ** गुरन. १३२/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१२२६ डी. एन. वाघमारे मो.क्र. ८८८८०७६९३५** हे करीत आहेत.

## ४) विदयुत शॉक लागुन आकस्मात मृत्यु :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०४.०६.२०१८ रोजी चे १५.३० वा. चे सुमारास मयताचे राहते घरी शंकरनगर वसरणी नांदेड येथे, यातील **मयत नामे बालाजी गंगाराम सुरशेवाड, वय ५० वर्षे रा. शंकरनगर वसरणी नांदेड** हा नमुद ठिकाणी घरामध्ये इलेक्ट्रीक करंट उतरत असल्याने तो विजेची पाहाणी करत असताना अचानक शॉक लागल्याने त्यास उपचारकामी स.द. विष्णुपरी येथे शरीक केले असता तो उपचारा दरम्यान मरण पावला. वगैरे **खबर देणार गजानन बालाजी सुरशेवाड, वय २८ वर्षे व्यवसाय मजुरी रा. हिंगोली गेट जवळ नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** आ.म्र. ५१/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.म्र. दाखल असुन **तपास पोहेकॉ/ १६३० देशमुख मो.क्र. ०२४६२-२२६३७३** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.